SAMPLE CONTENT

Perfect

# समाजशास्त्र

## इयत्ता अकरावी (कला)

सामाजीकरणाच्या प्रक्रियेवर विविध घटकांचा / माध्यमांचा प्रभाव पडतो, जसे की, कुटुंब, शेजारी, समवयस्क गट आणि व्यावसायिक गट.




मेघना जाधव
M.A., M.Ed., SET (Edu., Geog.)

सुरभी जोशी
M.A. (Economics)



Target Publications® Pvt. Ltd.

महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ, पुणे
यांच्याद्वारे निर्धारित नवीन पाठ्यपुस्तकावर आधारित.

PERFECT

# समाजशास्त्र

## इयत्ता अकरावी (कला)

### ठळक वैशिष्ट्ये

- नवीन पाठ्यपुस्तकावर आधारित
- संपूर्ण आशयाची मांडणी प्रश्नोत्तरांच्या स्वरूपात
- विविध प्रश्नप्रकारांचा समावेश
- 'पाठाची रूपरेषा' शीर्षकांतर्गत पाठाचा थोडक्यात आढावा
- 'आकलन हेतू स्पष्टीकरण' शीर्षकांतर्गत संकल्पनेची सुस्पष्टता
- दीर्घोत्तरी प्रश्नांची उत्तरे लक्षात ठेवण्याकरता आवश्यकतेनुसार स्मार्ट कोड व क्लृप्त्यांचा वापर
- 'ज्ञानगुरू' शीर्षकांतर्गत आशयासंबंधित अधिकची अभिरुचीपूर्ण माहिती.
- 'उपक्रम' शीर्षकांतर्गत पाठांतर्गत व स्वाध्यायांतर्गत विचारलेल्या उपक्रमांचा समावेश
- स्वयंमूल्यमापनाकरता पाठाच्या शेवटी सराव चाचणी समाविष्ट
- Q. R. Code द्वारे सराव चाचणीची उत्तरे व आवश्यकतेनुसार आशयासंबंधित माहिती उपलब्ध

Sample Content

Printed at: **Repro India Ltd.,** Mumbai

© *Target Publications Pvt. Ltd.*
*No part of this book may be reproduced or transmitted in any form or by any means, C.D. ROM/Audio Video Cassettes or electronic, mechanical including photocopying; recording or by any information storage and retrieval system without permission in writing from the Publisher.*

Balbharati Registration No.: 2018MH0022 **TEID: 2288** P.O. No. 3484

# प्रस्तावना

नमस्कार विद्यार्थी मित्र-मैत्रिणींनो, महाविद्यालयाची पायरी चढत असताना काही विषयांची नव्याने ओळख होत आहे. यातीलच एक विषय म्हणजे समाजशास्त्र हा होय. आपण समाजात राहत असल्याने हा विषय आपण जगत असतो; मात्र शास्त्रशुद्ध पद्धतीने तो अभ्यासणे आवश्यक आहे. 'समाजशास्त्र' इयत्ता अकरावी या पाठ्यपुस्तकातून समाजशास्त्र या ज्ञानशाखेची ओळख होत आहे. या पाठ्यपुस्तकात समाविष्ट समाजशास्त्रासंबंधित विविध संकल्पनांचा (समाज, सामाजिक संस्था, संस्कृती, सामाजीकरण, सामाजिक स्तरीकरण व सामाजिक परिवर्तन) अभ्यास करून प्रश्नोत्तराच्या स्वरूपात त्या सुस्पष्ट करण्याच्या हेतून टार्गेट प्रकाशनाचे **Perfect समाजशास्त्र : इयत्ता अकरावी (कला)** हे पुस्तक सादर करताना आम्हांला आनंद होत आहे.

सदर पुस्तकामध्ये पाठाच्या सुरुवातीला 'पाठाची रूपरेषा' अंतर्गत पाठाचा थोडक्यात आढावा घेतला आहे, जेणेकरून विद्यार्थ्यांना पाठातील आशयाची थोडक्यात ओळख होईल. तसेच, विविध प्रश्नप्रकारांद्वारे विद्यार्थ्यांची पाठाची पूर्ण तयारी होईल. काही ठिकाणी आवश्यकतेनुसार संकल्पनेच्या सुस्पष्टतेकरता आकलन हेतू स्पष्टीकरण देण्यात आले आहे. शिवाय उत्तरे लक्षात रहावीत याकरता उत्तरे मुद्द्यांच्या स्वरूपात, तसेच मुख्य मुद्दे ठळक स्वरूपात दिले आहेत. शिवाय, आवश्यकतेनुसार स्मार्ट कोड व क्लृप्त्यांचा वापर केला आहे. याव्यतिरिक्त ज्ञानगुरू शीर्षकांतर्गत आवश्यकतेनुसार आशयासंबंधित रुचिपूर्ण माहिती उपलब्ध करून दिली आहे. विद्यार्थ्यांमध्ये सामाजिक दृष्टिकोन विकसित करण्याच्या दृष्टीने दिलेले पाठांतर्गत व स्वाध्यायांतर्गत उपक्रम विद्यार्थ्यांनी करणे अपेक्षित आहे. हे उपक्रम सहज सोडवण्याकरता साहाय्य व्हावे यासाठी आवश्यकतेनुसार त्यासंबंधित मार्गदर्शनपर उत्तरे देण्यात आली आहेत. तसेच, विद्यार्थ्यांना आशयासंबंधित स्वयंमूल्यमापन करता यावे, यादृष्टीने पाठाच्या शेवटी सराव चाचणी उपलब्ध करून दिली आहे आणि याची उत्तरे Q. R. Code द्वारे पुरवण्यात आली आहेत. याव्यतिरिक्त, आवश्यकतेनुसार मार्गदर्शनाकरता उपक्रमांची उत्तरेही Q. R. Code मार्फत दिली आहेत.

हे पुस्तक परिपूर्ण होण्याकरता आम्ही सर्वतोपरी प्रयत्न केले आहेत. पुस्तकाची उत्कृष्टता अधिकाधिक वाढावी याकरता आपल्या सूचना व प्रतिक्रिया स्वागतार्ह आहेत. आपला अभिप्राय पुढील इ-मेल पत्त्यावर पाठवू शकता.

इ-मेल आयडी mail@targetpublications.org

**प्रकाशक**

**आवृत्ती:** प्रथम

Sample Content

**Disclaimer**

This reference book is transformative work based on textbook 'समाजशास्त्र : पुनर्मुद्रण: डिसेंबर २०२०' published by the Maharashtra State Bureau of Textbook Production and Curriculum Research, Pune. We the publishers are making this reference book which constitutes as fair use of textual contents which are transformed by adding and elaborating, with a view to simplify the same to enable the students to understand, memorize and reproduce the same in examinations.

This work is purely inspired upon the course work as prescribed by the Maharashtra State Bureau of Textbook Production and Curriculum Research, Pune. Every care has been taken in the publication of this reference book by the Authors while creating the contents. The Authors and the Publishers shall not be responsible for any loss or damages caused to any person on account of errors or omissions which might have crept in or disagreement of any third party on the point of view expressed in the reference book.

© reserved with the Publisher for all the contents created by our Authors.

No copyright is claimed in the textual contents which are presented as part of fair dealing with a view to provide best supplementary study material for the benefit of students.

# वैशिष्ट्ये

**पाठाची रूपरेषा**

‘पाठाची रूपरेषा’ या शीर्षकांतर्गत पाठाचा थोडक्यात व सुस्पष्ट आढावा घेण्यात आला आहे.

**विविध प्रश्नप्रकारांचा समावेश**

प्रत्येक पाठात स्वाध्यायांतर्गत दिलेल्या प्रत्येक प्रश्नाचा व सरावाकरता अधिकच्या प्रश्नांचा समावेश करण्यात आला आहे.

**आकलन हेतू स्पष्टीकरण**

संकल्पनेच्या सुस्पष्टतेकरता आवश्यकतेनुसार ‘आकलन हेतू स्पष्टीकरण’ समाविष्ट केले आहे.

**स्मार्ट कोड, क्लृप्ती व मुख्य मुद्दे ठळक स्वरूपात**

दीर्घोत्तरी प्रश्नांची उत्तरे लक्षात ठेवण्याच्या दृष्टीने आवश्यकतेनुसार स्मार्ट कोड व क्लृप्त्यांचा वापर केला आहे. तसेच, बहुतांशी उत्तरांमध्ये मुख्य मुद्दे ठळक स्वरूपात दिले आहेत.

**ज्ञानगुरू**

‘ज्ञानगुरू’ शीर्षकांतर्गत आशयासंबंधित अधिकची अभिरुचीपूर्ण माहिती देण्यात आली आहे.

**Q. R. Code**

सराव चाचणीची उत्तरे, आवश्यकतेनुसार आशयासंबंधितची माहिती व उपक्रमाची मार्गदर्शनपर उत्तरे Q. R. Code द्वारे उपलब्ध करून देण्यात आली आहेत.

Sample Content

# अनुक्रमणिका


| घटक | पाठाचे नाव | पृष्ठ क्रमांक |
|---|---|---|
| | **विभाग १** | १ |
| १. | समाजशास्त्राची परिचय | १३ |
| २. | पाश्चिमात्य आणि भारतीय समाजशास्त्रज्ञांचे योगदान | २६ |
| ३. | समाजशास्त्रातील मूलभूत संकल्पना | ३९ |
| ४. | सामाजिक संस्था | ५५ |
| ५. | संस्कृती | ६६ |
| ६. | सामाजीकरण | ७९ |
| ७. | सामाजिक स्तरीकरण | ८९ |
| ८. | सामाजिक परिवर्तन | ९९ |
| | **विभाग २** | |
| | उतारे | १०८ |


**टीप:** १. पाठाखालील स्वाध्यायांतर्गत दिलेले प्रश्न * या चिन्हाने दर्शवले आहेत.
२. पाठामध्ये चौकटीत दिलेल्या आशयासंबंधित प्रश्न # या चिन्हाने दर्शवले आहेत.

Sample Content

विभाग - I

# १ समाजशास्त्राचा परिचय

## पाठाची रूपरेषा

| | |
|---|---|
| **समाजशास्त्राचा अर्थ/व्याख्या** | १. समाजशास्त्र हे समाजाचे शास्त्र आहे.<br>२. समाजशास्त्र: Socius (सहकारी / सहयोगी) + Logos (शास्त्र / अभ्यास)<br>३. ऑगस्ट कॉम्त: "सामाजिक व्यवस्था आणि प्रगतीचा अभ्यास करणारे शास्त्र म्हणजे समाजशास्त्र." |
| **समाजशास्त्राचे स्वरूप** | १. अनुभवाधिष्ठित विज्ञान: प्रत्यक्ष अनुभवांवर आधारित सामाजिक तथ्यांचा अभ्यास.<br>२. सैद्धान्तिक आणि उपयोजित विज्ञान: जुन्या सिद्धान्तांचे परीक्षण व नवीन सिद्धान्तांची निर्मिती करणे आणि सामाजिक ज्ञानाच्या उपयोजनावर आधारित.<br>३. तथ्यांवर आधारित विज्ञान: समाजात 'जे जसे घडते तसा अभ्यास.'<br>४. समग्र विज्ञान: संपूर्ण समाज व सामाजिक जीवनाच्या सर्व पैलूंच्या अभ्यासाचा समावेश. |
| **समाजशास्त्राचा उदय** | १. व्यापारी क्रांती: सन १४५० ते सन १८०० या काळातील अनेक घटनांची मालिका<br>२. औद्योगिक क्रांती: १८ व्या शतकातील इंग्लंडमध्ये घडून आलेली औद्योगिक क्रांती.<br>३. फ्रेंच राज्यक्रांती: १७८९ मध्ये, फ्रान्समध्ये घडून आलेली राज्यक्रांती.<br>४. वैज्ञानिक क्रांती: पुनरुज्जीवनाच्या कालखंडातील युरोपमधील वैज्ञानिक क्रांती.<br>५. नागरीकरण: मुख्यत्वे औद्योगिक क्रांतीचा परिणाम म्हणून घडून आले.<br>६. या सर्व क्रांतींचा 'समाजशास्त्र' हे एक विद्याशाखा म्हणून उदयास येण्यावर प्रभाव पडला. |
| **समाजशास्त्राची व्याप्ती** | १. जैव समाजशास्त्र: मानवी सामाजिक जीवनातील जीवशास्त्राच्या भूमिकेचा अभ्यास.<br>२. कलेचे समाजशास्त्र: कला जगत आणि सौंदर्यशास्त्राचा सामाजिक संदर्भाच्या अनुषंगाने केलेला अभ्यास.<br>३. विपणन बाजार संशोधनाचे समाजशास्त्र: समाजशास्त्रातील व बाजारनीतीतील सैद्धान्तिक ज्ञान, ग्राहकांच्या विविध प्रकारांचे ज्ञान व गरजा यांचे विश्लेषण.<br>४. दृश्य माध्यमाचे समाजशास्त्र: सामाजिक जीवनातील दृश्यांचा अभ्यास.<br>५. डायस्पोरा अध्ययन: स्थलांतर व त्याचा मानवी जीवनावर होणारा परिणाम आणि आंतरराष्ट्रीय संबंधांविषयींचा अभ्यास.<br>६. इतर अभ्यास क्षेत्रे: चित्रपट अध्ययन, विकास अध्ययन, संस्कृती अध्ययन. |
| **समाजशास्त्राचे महत्त्व** | १. समाजाचा शास्त्रशुद्ध अभ्यास करणे शक्य झाले.<br>२. सामाजिक विविधतेसंबंधिचे ज्ञान देते.<br>३. सामाजिक वास्तवाकडे बघण्याचा वैज्ञानिक दृष्टिकोन विकसित होतो.<br>४. व्यवसायाभिमुख आहे.<br>५. सामाजिक समस्यांवर उपाययोजना देते.<br>६. लोकांना काळानुरूप ज्ञान देते आणि दक्ष ठेवते. |
| **समाजशास्त्रीय कल्पनाविस्तार** | १. आपल्या दैनंदिन जीवनाचा अर्थ चांगल्याप्रकारे समजून घेण्यासाठी समाजशास्त्रीय कल्पना विस्तार उपयुक्त ठरतो.<br>२. सी. राईट मिल्स यांनी 'The Sociological Imagination' हे पुस्तक लिहिले.<br>३. समाजशास्त्रज्ञांकडे विशेष वैचारिक दृष्टी असते असा त्यांना विश्वास होता. |

Sample Content

## व्याख्या

**१. समाजशास्त्र**

i. **ऑगस्ट कॉम्त:** "सामाजिक व्यवस्था आणि प्रगतीचा अभ्यास करणारे शास्त्र म्हणजे समाजशास्त्र."

ii. **जॉर्ज सिमेल:** "समाजशास्त्र हे मानवी आंतरसंबंधांच्या स्वरूपाचे अध्ययन करणारे शास्त्र आहे."

iii. **ऑक्सफर्ड डिकशनरी:** "समाजशास्त्र म्हणजे मानवी समाजाचा विकास, संरचना आणि कार्य यांचा अभ्यास होय."

## प्र.१.(अ) दिलेल्या पर्यायांपैकी योग्य पर्याय निवडून विधाने पूर्ण करा.

१. समाजशास्त्राचा एक विद्याशाखा म्हणून _______ मध्ये उदय झाला. (आशिया, युरोप, आफ्रिका)

*२. समाजशास्त्राचे जनक _______ यांना मानले जाते. (डरखाईम, वेबर, कॉम्त)

*३. Socius या शब्दाचा अर्थ _______ हा होय. (शास्त्र, सहकारी, सामाजिक)

*४. Logos या शब्दाचा अर्थ _______ हा होय. (सहयोगी, शास्त्र, सामाजिक)

५. कॉम्त यांच्या मते, समाजशास्त्र म्हणजे सामाजिक _______ अभ्यास करणारे शास्त्र होय. (व्यवस्थेचा, विकासाचा, संबंधांचा)

*६. समाजशास्त्रज्ञ जेव्हा दैनंदिन जीवनातील व्यावहारिक प्रश्न सोडवण्याचा प्रयत्न करतात तेव्हा त्याला _______ शास्त्र म्हणतात. (शुद्ध, व्यावहारिक / उपयोजित, सैद्धान्तिक)

#७. _______ हे प्रबोधनकाळातील बुद्धिप्रामाण्यवादी विचारवंत होत. (सिसेरो, कॉम्त, सिमेल)

८. _______ क्रांतीने जुन्या युरोपातील प्रत्येक गोष्टीला आव्हान उभे केले. (वैज्ञानिक क्रांती, फ्रेंच, व्यापारी)

९. _______ क्रांती १८ व्या शतकात युरोपमध्ये घडून आली. (व्यापारी, औद्योगिक, वैज्ञानिक)

१०. औद्योगिक क्रांतीमुळे अर्थव्यवस्थेचे _______ उत्पादन व्यवस्थेत रूपांतर झाले. (सरंजामशाही, संघ, भांडवलशाही)

११. _______ हा विषय कॉम्त आणि डरखाईम यांसारख्या समाजशास्त्रज्ञांच्या जिव्हाळ्याचा विषय बनला होता. (सामाजिक व्यवस्था, आर्थिक व्यवस्था, कौटुंबिक व्यवस्था)

१२. _______ क्रांतीचा प्रभाव भौतिक बदल आणि निसर्ग व समाजाबद्दलच्या कल्पनांवरही परिणाम करणारा होता. (व्यापारी, फ्रेंच, वैज्ञानिक)

#१३. ग्रीक भाषेत डायस्पोरा म्हणजे _______ होय. (विखुरणे, भटकणे, रूपांतर)

#१४. समाजशास्त्रामध्ये _______ वर्ग, वंश, लिंगभाव, वांशिकता यांचा अभ्यास करण्यासाठी संहिता म्हणून पाहिले जाते. (चित्रपटांकडे, संस्कृतीकडे, विकासाकडे)

#१५. ______ मध्ये 'विकसित' आणि 'विकसनशील' समाजातील परस्परसंबंधांच्या अभ्यासावर लक्ष केंद्रित केले जाते. (संस्कृती अध्ययन, विकास अध्ययन, डायस्पोरा अध्ययन)

#१६. _______ ची सुरुवात इंग्लंडमधील बर्मिंगहॅम सेंटर फॉर कॉन्टेम्पररी कल्चरल स्टडी येथे झाली. (संस्कृती अध्ययन, विकास अध्ययन, दृश्य समाजशास्त्र)

**उत्तरे:**

| | | | |
|---|---|---|---|
| १. | युरोप | २. | कॉम्त |
| ३. | सहकारी | ४. | शास्त्र |
| ५. | व्यवस्थेचा | ६. | व्यावहारिक/उपयोजित |
| ७. | सिसेरो | ८. | फ्रेंच |
| ९. | औद्योगिक | १०. | भांडवलशाही |
| ११. | सामाजिक व्यवस्था | १२. | वैज्ञानिक |
| १३. | विखुरणे | १४. | चित्रपटांकडे |
| १५. | विकास अध्ययन | १६. | संस्कृती अध्ययन |

## प्र.१. (ब) चुकीची जोडी दुरुस्त करून लिहा.

१. i. मानवी ज्ञान हे अनुभवाच्या आधारेच सिद्ध करता येते हा वैचारिक दृष्टिकोन – अनुभवाधिष्ठिततावाद
ii. युरोपीय विचारांचा असा कालखंड ज्यात कारणमीमांसा व अनुभव यावर भर दिला गेला – प्रबोधन काळ
iii. सन १४५० ते सन १८०० दरम्यान घडलेल्या घटनांची मालिका – फ्रेंच क्रांती
iv. भांडवलशाही अर्थव्यवस्थेतील आदर्श – मुक्त बाजारपेठ

२. i. व्यापार, उद्योग, बँकसेवा यांचा विस्तार – व्यापारी क्रांती
ii. नवनवीन साधने व तंत्रज्ञानातील सुधारणा – औद्योगिक क्रांती
iii. समाजात नवीन सामाजिक व्यवस्था बसवण्याचा प्रयत्न – फ्रेंच राज्यक्रांती
iv. समाजशास्त्रामध्ये वैज्ञानिक दृष्टिकोन रुजवण्याचा प्रयत्न – नागरीकरण

*३. i. जीवशास्त्राच्या मानवी सामाजिक जीवनातील भूमिकेचा अभ्यास – जैव समाजशास्त्र
ii. सौंदर्यशास्त्र आणि कलाजगताचा अभ्यास – कलेचे समाजशास्त्र

Sample Content

iii. समाजशास्त्र व बाजारनीतितील सैद्धान्तिक ज्ञान व ग्राहकांचे विविध प्रकार व त्यांच्या गरजांचे विश्लेषण – बाजार संशोधनाचे समाजशास्त्र

iv. सामाजिक जीवनातील दृश्यांचा, चित्रांचा अभ्यास – डायस्पोरा अध्ययन

४. i. या कालखंडात युरोपमध्ये वैज्ञानिक क्रांती घडून आली – पुनरुज्जीवन कालखंड

ii. फ्रेंच राज्यक्रांती या वर्षी घडून आली – १७८९

iii. इंग्लंडमधील संस्कृती अध्ययनास सुरुवात – ऑक्सफर्ड युनिर्व्हसिटी

iv. शहरी जीवनाचे स्वरूप आणि समस्या यांकडे आकर्षित झालेले समाजशास्त्रज्ञ – वेबर, सिमेल

**उत्तरे:**

१. सन १४५० ते सन १८०० दरम्यान घडलेल्या घटनांची मालिका – व्यापारी क्रांती

२. समाजशास्त्रामध्ये वैज्ञानिक दृष्टिकोन रुजवण्याचा प्रयत्न – वैज्ञानिक क्रांती

३. सामाजिक जीवनातील दृश्यांचा, चित्रांचा अभ्यास – दृश्य माध्यमांचा अभ्यास करणारे समाजशास्त्र

४. इंग्लंडमधील संस्कृती अध्ययनास सुरुवात – बर्मिंगहॅम सेंटर फॉर कॉन्टेम्पररी कल्चरल स्टडी

### प्र.१. (क) प्रत्येक विधान वाचा आणि चौकटीत दिलेल्या योग्य संज्ञा ओळखून लिहा.

| संज्ञा |
|---|
| डायस्पोरा अभ्यास, वैज्ञानिक क्रांती, The Positive Philosophy, संघ पद्धती, सैद्धान्तिक विज्ञान, शिकागो स्कूल, The Sociological Imagination, चित्रपटांचे समाजशास्त्र, समग्र विज्ञान, औद्योगिक क्रांती, अनुभवाधिष्ठितता |

*१. कॉम्तने समाजशास्त्र ही संज्ञा प्रथम या ग्रंथात वापरली.

#२. सी राईट मिल्स यांनी लिहिलेले पुस्तक.

३. समाजशास्त्राचे प्रमुख वैशिष्ट्य.

*४. समाजशास्त्रीय सिद्धान्ताचा विकास करणे हे समाजशास्त्रात महत्त्वाचे असते.

५. समाजशास्त्र हे संपूर्ण समाजाचा अभ्यास करते ही संकल्पना.

#६. १३ व्या शतकातील युरोपमधील एक प्रचलित वैशिष्ट्यपूर्ण उत्पादन पद्धत.

७. यामुळे, हस्तनिर्मित वस्तूंकडून नव्या यंत्रोत्पादित वस्तूंकडे वाटचाल सुरू झाली.

८. या क्रांतीच्या काळातील नवीन वैज्ञानिक शोधांमुळे अंधश्रद्धांचे उच्चाटन होत होते.

९. पहिले अमेरिकन समाजशास्त्रीय विचारपीठ.

१०. चित्रपट आणि समाजशास्त्र यांना जोडणारे अभ्यासक्रम

**उत्तरे:**

१. The Positive Philosophy

२. The Sociological Imagination

३. अनुभवाधिष्ठितता

४. सैद्धान्तिक विज्ञान

५. समग्र विज्ञान

६. संघ पद्धती

७. औद्योगिक क्रांती

८. वैज्ञानिक क्रांती

९. शिकागो स्कूल

१०. चित्रपटांचे समाजशास्त्र

### प्र.१. (ड) अधोरेखित शब्दाच्या जागी अचूक शब्द लिहून विधाने पूर्ण करा.

**१. समाजशास्त्राचा स्वतंत्र विद्याशाखा म्हणून १८ व्या शतकाच्या मध्यात उदय झाला.**

**उत्तर:** समाजशास्त्राचा स्वतंत्र विद्याशाखा म्हणून १९ व्या शतकाच्या मध्यात उदय झाला.

**२. मानसशास्त्राच्या उदयानंतर मानवी समाजाचा अभ्यास करण्याचा दृष्टिकोन बदलला.**

**उत्तर:** समाजशास्त्राच्या उदयानंतर मानवी समाजाचा अभ्यास करण्याचा दृष्टिकोन बदलला.

**३. समाजशास्त्र हे लोकांचे शास्त्र आहे.**

**उत्तर:** समाजशास्त्र हे समाजाचे शास्त्र आहे.

**४. कॉम्त यांनी सुरुवातीला समाजाच्या शास्त्रास समाजशास्त्र ही संज्ञा वापरली.**

**उत्तर:** कॉम्त यांनी सुरुवातीला समाजाच्या शास्त्रास सामाजिक पदार्थविज्ञान ही संज्ञा वापरली.

***५. जेव्हा समाजशास्त्रीय संशोधन हे फक्त संशोधनाच्याच हेतूने केले जाते तेव्हा त्याला व्यावहारिक शास्त्र म्हणतात.**

**उत्तर:** जेव्हा समाजशास्त्रीय संशोधन हे फक्त संशोधनाच्याच हेतूने केले जाते तेव्हा त्याला सैद्धान्तिक शास्त्र म्हणतात.

**६. समाजशास्त्र हे काल्पनिक शास्त्र आहे.**

**उत्तर:** समाजशास्त्र हे तथ्यांवर आधारित शास्त्र आहे.

**७. समाजशास्त्राचा शास्त्रीय विद्याशाखा म्हणून 'प्राचीन काळात' उदय झालेला दिसून येतो.**

**उत्तर:** समाजशास्त्राचा शास्त्रीय विद्याशाखा म्हणून 'प्रबोधन काळात' उदय झालेला दिसून येतो.

**८. व्यापारी क्रांती ही स्वातंत्र्य आणि समता यांसाठीच्या मानवी लढ्याच्या इतिहासातील मैलाचा दगड ठरली.**

**उत्तर:** फ्रेंच राज्यक्रांती ही स्वातंत्र्य आणि समता यांसाठीच्या मानवी लढ्याच्या इतिहासातील मैलाचा दगड ठरली.

Sample Content

**९. स्वातंत्र्य, समता आणि बंधुता ही मूल्ये चीनच्या राज्यघटनेत समाविष्ट आहेत.**

उत्तर: स्वातंत्र्य, समता आणि बंधुता ही मूल्ये भारतीय राज्यघटनेत समाविष्ट आहेत.

**१०. प्रबोधनाचा कालखंड हा औद्योगिक क्रांतीचा साक्षीदार होता.**

**उत्तर:** प्रबोधनाचा कालखंड हा वैज्ञानिक क्रांतीचा साक्षीदार होता.

**११. जैव-समाजशास्त्र सामाजिक जीवनातील सर्व दृश्यांचा अभ्यास करते.**

**उत्तर:** दृश्य-माध्यम समाजशास्त्र सामाजिक जीवनातील सर्व दृश्यांचा अभ्यास करते.

***१२. बलात्कार, द्वेष, गुन्हा आणि दहशतवाद ही सामाजिक संस्थेची उदाहरणे आहेत.**

**उत्तर:** बलात्कार, द्वेष, गुन्हा आणि दहशतवाद ही सामाजिक समस्येची उदाहरणे आहेत.

## प्र.२. (अ) दिलेल्या संकल्पनांचे योग्य उदाहरण द्या आणि तुमच्या उत्तराचे समर्थन करा.

**१. समाजशास्त्र - समाजाचे शास्त्र**

**उत्तर:**

i. **उदाहरण:** सामाजिक संबंध, समूह, संरचना, दर्जा, नियमने समस्या इत्यादींचा शास्त्रीय अभ्यास.

ii. समाजशास्त्र म्हणजे सामाजिक घटना आणि सामाजिक संबंधांचा अभ्यास.

iii. समाजशास्त्र हे समाजाशी संबंधित सर्व घटकांचा शास्त्रीय पद्धतीने अभ्यास करते.

***२. समाजशास्त्राचे अनुभवाधिष्ठित स्वरूप**

**उत्तर:**

i. **उदाहरण:** व्यावसायिक कंपन्यांमध्ये काम करणाऱ्या लोकांमधील संबंधांचा अभ्यास.

ii. अनुभवाधिष्ठितवादानुसार ज्ञान हे प्रत्यक्ष अनुभववार आधारित असते.

iii. समाजशास्त्र हे अनुभवाधिष्ठित विज्ञान आहे, कारण यात प्रत्यक्ष निरीक्षणावर सामाजिक तथ्यांचे विश्लेषण केले जाते. वरील उदाहरणात, केवळ आरामखुर्चीत बसून केलेल्या तात्त्विक चिंतन किंवा विचारांवर आधारित नाही, तर प्रत्यक्ष अनुभववार (मुलाखत किंवा निरीक्षणांच्या आधारे) संबंध अभ्यासले जातात.

**आकलन हेतू स्पष्टीकरण**

**आरामखुर्ची तत्वज्ञान:** यात एखाद्या विशिष्ट विषयावरचे ज्ञान मिळवताना व्यावहारिक किंवा प्रत्यक्ष अनुभव समाविष्ट नसतो.

**३. समाजशास्त्र - तथ्यांवर आधारित विज्ञान**

**उत्तर:**

i. **उदाहरण:** समाजातील नैतिक आणि अनैतिक घटकांचा अभ्यास.

ii. समाजशास्त्राचा उद्देश हा समाजातील सत्य घटनांचा शोध घेणे हा असतो.

iii. वरील उदाहरणात, 'काय असले पाहिजे' यापेक्षा 'काय आहे' याचा विचार समाजशास्त्रात केला जातो. यात समाजातील अनैतिक घटकांवर योग्य किंवा अयोग्य असे मत न नोंदवता समाजात 'जे जसे आहे' त्याचे विश्लेषण केले जाते.

***४. विकास अध्ययन**

**उत्तर:**

i. **उदाहरण:** ग्रामीण आणि शहरी समाजातील विकासाचा तुलनात्मक अभ्यास.

ii. विकास अध्ययनात समाजातील विकासाशी संबंधित घटकांचा विचार केला जातो.

iii. वरील उदाहरणात, ग्रामीण आणि शहरी भागातील असमानतांचे विश्लेषण, विकासाशी निगडित प्रश्न, विविध संस्थांची विकासातील भूमिका, विकसित आणि विकसनशील समाजातील परस्परसंबंध यांवर लक्ष केंद्रित केले जाते.

## प्र.२. (ब) टिपा लिहा.

**१. समाजशास्त्र या शब्दाचा उगम**

**उत्तर:**

i. १८३९ मध्ये, फ्रेंच तत्त्ववेत्ता ऑगस्ट कॉम्त यांनी Sociology (समाजशास्त्र) हा इंग्रजी शब्द प्रथम वापरला.

ii. कॉम्त यांनी आपल्या 'Positive Philosophy' या ग्रंथाच्या चौथ्या आवृत्तीत 'समाजशास्त्र' ही संज्ञा सर्वप्रथम वापरली.

iii. 'Sociology' ही संज्ञा लॅटिन भाषेतील असून 'Socius' म्हणजे सहकारी किंवा सहयोगी (कालांतराने हा शब्द समाज या अर्थाने वापरला जाऊ लागला.) व 'Logos' म्हणजे शास्त्र किंवा अभ्यास.

iv. व्युत्पत्तीनुसार समाजशास्त्र म्हणजे 'समाजाचे शास्त्र'. कॉम्स यांनी सामाजिक घटनांचा शास्त्रीय पद्धतीने अभ्यास करणारे समाजशास्त्र हे नवीन शास्त्र शोधले.

v. सुरुवातीस कॉम्त यांनी या शास्त्रास 'सामाजिक पदार्थविज्ञान' हे नाव दिले. नंतर हे शास्त्र 'समाजशास्त्र' म्हणून ओळखले जाऊ लागले.

**आकलन हेतू स्पष्टीकरण**

व्युत्पत्तीशास्त्रात शब्दाचे मूळ, इतिहास यांचा अभ्यास समाविष्ट असतो. तसेच, यात शब्दाचा उगम, स्वरूप आणि अर्थ काळाच्या ओघात कसे बदलत जातात याचाही अभ्यास केला जातो.

Sample Content

*२. **समाजशास्त्राचे स्वरूप**

**उत्तर:** स्मार्ट कोड | अ | सै | त | स

**i.** **अनुभवाधिष्ठित विज्ञान:** हे शास्त्र वैज्ञानिक पद्धतीने सामाजिक तथ्यांचा अभ्यास करते. या पद्धतीत प्रत्यक्ष अनुभवांचे विश्लेषण केले जाते. या अनुभवांच्या आधारे सामाजिक नियम तयार केले जातात.

**ii.** **सैद्धान्तिक आणि उपयोजित विज्ञान:** नवीन समाजशास्त्रीय सिद्धान्तांची निर्मिती करणे आणि जुन्या सिद्धान्तांचे परीक्षण करणे यामुळे हे एक शुद्ध सैद्धान्तिक शास्त्र म्हणून ओळखले जाते; मात्र याच्या विविध शाखा या सामाजिक ज्ञानाच्या उपयोजनावर आधारित असल्याने त्यांचा समाजामध्ये मोठा उपयोग होत आहे. याचाच अर्थ समाजशास्त्र हे शुद्ध विज्ञान, तसेच ते एक उपयोजित विज्ञानही आहे.

**iii.** **तथ्यांवर आधारित विज्ञान:** समाजात 'काय असले पाहिजे' यापेक्षा 'काय आहे' म्हणजेच समाजातील वास्तव शोधण्याचा हे शास्त्र प्रयत्न करते. उदा. समाजातील संघटनात्मक आणि विघटनात्मक घटकांचा अभ्यास या शास्त्रात केला जातो.

**iv.** **समग्र विज्ञान:** हे एखाद्या सामाजिक भागापुरतेच मर्यादित नसते, तर यात सामाजिक जीवनाच्या सर्व पैलूंचा अभ्यास केला जातो. त्यामुळे, समाजशास्त्र हे संपूर्ण समाजाचा अभ्यास करणारे शास्त्र आहे.

३. **व्यापारी क्रांती**

**उत्तर:**

i. सन १४५० ते सन १८०० दरम्यान घडलेल्या घटनांची मालिका म्हणजे व्यापारी क्रांती होय.

ii. यामुळे, उद्योग आणि व्यापाराचा मोठ्या प्रमाणावर विस्तार झाला. भूमार्गांपेक्षा सागरीमार्गांचा वापर केला जाऊ लागला. युरोपच्या बाजारपेठा पूर्वेकडील उत्पादित माल, मसाले, कपडे यांनी गजबजू लागल्या.

iii. बँक सेवेचा मोठ्या प्रमाणावर विस्तार होऊ लागला. कागदी चलन अस्तित्वात आले.

iv. आर्थिक सत्तेत वाढ झाल्याने मध्यमवर्गाचा प्रभावही वाढू लागला.

v. या क्रांतीने मध्ययुगीन युरोपातील कुंठित अर्थव्यवस्थेचे एका वेगवान जागतिक अर्थव्यवस्थेत रूपांतर केले.

vi. यामुळे, युरोपीय देशांची आर्थिक व राजकीय सत्ता निर्माण झाली.

vii. या सर्व बदलांची परिणती सामाजिक संबंधांमध्ये बदल होण्यात झाली.

*४. **प्रबोधन काळ**

**उत्तर:**

i. समाजशास्त्राचा एक शास्त्रीय विद्याशाखा म्हणून प्रबोधनाच्या कालखंडात उदय झाला.

ii. हा युरोपीय विचारांचा कालखंड लक्षणीय अशा सामाजिक, राजकीय आणि आर्थिक बदलांचा साक्षीदार ठरला.

iii. या काळात विवेकवादी तर्कशुद्ध, शास्त्रीय विचारांना महत्त्व प्राप्त झाले. धार्मिक आणि पारंपरिक अधिकारांना आव्हान देण्यात आले.

iv. पारंपरिक विचारप्रक्रियेमध्ये बदल होऊन विचार करण्याच्या आणि वास्तवाकडे बघण्याच्या नवीन पद्धती पुढे आल्या. जीवनातील प्रत्येक गोष्टीकडे नवीन दृष्टिकोनातून प्रत्येक जण पाहू लागला.

v. तर्कशुद्ध, वैज्ञानिक आणि विवेकवादी विचारांना अतिशय महत्त्व प्राप्त झाले.

vi. या काळातील थॉमस हॉब्ज, जॉन लॉक, रूसो, माँटेस्क्यु, फ्रान्सिस बेकन, सिसेरो, मॅकिअॅव्हली इत्यादी बुद्धिप्रामाण्यवादि विचारवंतांनी कार्यकारण संबंधांना महत्त्व दिले.

vii. या कालखंडात धर्मनिरपेक्ष, उदारमतवादी आणि लोकशाही मूल्ये जपणारा समाज निर्माण झाला.

५. **औद्योगिक क्रांती**

**उत्तर:**

i. इंग्लंडमध्ये १८ व्या शतकात औद्योगिक क्रांती घडून आली. या क्रांतीने इंग्लंड, इतर युरोपीय देश आणि इतर खंडांतील लोकांचे सामाजिक आणि आर्थिक जीवन बदलले.

ii. नवनवीन साधने, यंत्रे व तंत्रज्ञानात सुधारणा होत गेल्यामुळे मोठ्या प्रमाणावर वस्तूंचे उत्पादन होऊ लागले, ज्यामुळे कारखाना उत्पादन पद्धती निर्माण झाली. या आर्थिक बदलांचा परिणाम होऊन सरंजामशाही व्यवस्थेचे भांडवलशाही व्यवस्थेत रूपांतर झाले.

iii. हस्तनिर्मित वस्तूंची जागा नव्या यंत्रोत्पादित वस्तूंनी घेतली.

iv. संपूर्ण औद्योगिक व्यवस्थेवर भांडवलदारांचे नियंत्रण आले.

v. संघ पद्धतीचा अस्त, तर नोकरशाही व कारखाना पद्धतीची निर्मिती, तसेच शहरी भागांकडे स्थलांतर, कामगारांची श्रमविभागणी, वर्गव्यवस्था कामगार संघटना आर्थिक असमानता आणि लोकशाही पद्धती यांसारखे दृश्य व अदृश्य परिणाम औद्योगिक क्रांतीमुळे झाले.

vi. या क्रांतीमुळे निर्माण झालेल्या समस्यांच्या अभ्यासावर कॉम्त, डरखाईम, मार्क्स, वेबर, सिमेल या समाजशास्त्रज्ञांनी लक्ष केंद्रित केले. विशेषकरून कामगारांची स्थिती, संपत्तीचे हस्तांतरण, नागरीकरण या मुद्द्यांचा अभ्यास समाजशास्त्रज्ञांसाठी महत्त्वाचा होता.

Sample Content

*६. **समाजशास्त्रातील नवीन अभ्यास क्षेत्रे**

उत्तर:

| स्मार्ट कोड | जै | वि | क | | दृ | डा |
|---|---|---|---|---|---|---|

i. **जैव समाजशास्त्र:** ही शाखा नव्याने निर्माण झाली आहे. यात संशोधक समाजशास्त्रातील विविध तंत्रे आणि पद्धतीचा, तसेच या पद्धतींच्या निष्कर्षांचा उपयोग करून सामाजिक जीवनातील जीवशास्त्राच्या भूमिकेचा अभ्यास करतात.

ii. **विपणन बाजार संशोधनाचे समाजशास्त्र:** यात अर्थपूर्ण पद्धतीने बाजारनीती समजावून घेण्याचा प्रयत्न केला जातो. तसेच, यात समाजशास्त्रातील व बाजारनीतीतील सैद्धान्तिक ज्ञान, ग्राहकांच्या विविध प्रकारांचे ज्ञान व गरजा यांचे विश्लेषण केले जात असल्यामुळे ही समाजशास्त्राची व्यावहारिक शाखा आहे.

iii. **कलेचे समाजशास्त्र:** यात कला जगत आणि सौंदर्यशास्त्राचा अभ्यास केला जातो. कलेचे उत्पादन व ग्रहण यांचा सामाजिक संदर्भ समजून घेण्याचा प्रयत्न केला जातो.

iv. **दृश्य माध्यमांचे समाजशास्त्र:** समाजशास्त्रीय संशोधनात सर्व दृश्य प्रतिमांचा सामाजिक तथ्य म्हणून वापर करण्याचा प्रयत्न या शाखेद्वारा केला जातो. सामाजिक जीवनातील सर्व दृश्यांचा या शाखेत अभ्यास केला जातो.

v. **डायस्पोरा अध्ययन:** यात प्रामुख्याने स्थलांतर व त्याचे मानवी जीवनातील विविध भागांवर होणारे परिणाम अभ्यासले जातात. उदा. सांस्कृतिक साहित्यिक, सामाजिक, आर्थिक, लोकसंख्याविषयक व मानववंशशास्त्रविषयक आणि राजकीय परिणाम. याशिवाय, आंतरराष्ट्रीय संबंध यांचा अभ्यास केला जातो. हा समाजशास्त्रात नव्याने अभ्यासला जाणारा अभ्यास विषय आहे.



**ज्ञानगुरू**

**मार्टिन ल्यूथर किंग ज्युनिअर आणि मिशेल ओबामा यांच्यातील साम्य तुम्हांला माहीत आहे का?**

**उत्तर:** हे दोघेही समाजशास्त्राचे पदवीधर आहेत!

७. **चित्रपट, विकास आणि संस्कृती अध्ययन**

उत्तर:

i. **चित्रपट अध्ययन:** चित्रपट अध्ययनात चित्रपटांकडे विविध सैद्धान्तिक, ऐतिहासिक आणि समीक्षात्मक दृष्टिकोनातून पाहिले जाते. तसेच, यात चित्रपटांच्या परिणामांचा अभ्यास केला जातो. ही २० व्या शतकातील एक नवीन विद्याशाखा आहे. वर्ग, वंश, लिंगभाव, वांशिकता यांसारख्या सामाजिक गटांचा अभ्यास करण्यासाठी समाजशास्त्रामध्ये चित्रपटांकडे संहिता म्हणून पाहिले जाते. 'चित्रपटांतून समाजशास्त्र' किंवा 'चित्रपटांचे समाजशास्त्र' असे अभ्यासक्रम सुरू करण्यात आले आहेत.

ii. **विकास अध्ययन:** यात जागतिक विकासातील असमानता शोधण्याचा प्रयत्न केला जातो. ऐतिहासिक संदर्भ तपासून प्रश्न व प्रक्रिया आणि विकास यांचा अभ्यास केला जातो. तसेच, यात विकसित आणि विकसनशील समाजातील परस्परसंबंध, या समाजातील विविध संस्थांची भूमिका आणि त्यांचे बदलांच्या प्रक्रियेस व त्याच्या परिणामांचादेखील अभ्यास केला जातो.

iii. **संस्कृती अध्ययन:** संस्कृती अध्ययनात संस्कृती निर्मितीची प्रक्रिया अभ्यासली जाते. यात समकालीन लोकप्रिय संस्कृती समजून घेणे शक्य होते. समकालीन संस्कृती अध्ययनात महानगर संस्कृतीमधील जीवनशैली, उपभोग आणि सामाजिक संबंध यांचा अभ्यास केला जातो.

## प्र.३. फरक स्पष्ट करा.

*१. **नैसर्गिक शास्त्र आणि सामाजिक शास्त्र**

उत्तर:

| क्र. | नैसर्गिक शास्त्र | सामाजिक शास्त्र |
|---|---|---|
| i. | नैसर्गिक शास्त्र ही भौतिक जगाशी संबंधित विज्ञानाची शाखा आहे. | सामाजिक शास्त्र म्हणजे मानवी समाज आणि सामाजिक संबंध यांचा शास्त्रीय अभ्यास होय. |
| ii. | यात एखाद्या घटनेचा अभ्यास हा वस्तुनिष्ठ वैज्ञानिक पद्धती आणि साधनांवर अवलंबून असतो. | हे मुख्यत्वे माणसाच्या निरीक्षण आणि अनुभवांवर अवलंबून असते. |
| iii. | याचे निष्कर्ष अचूक असतात आणि प्रयोगशाळेत या शोधांची पडताळणी करणे शक्य असते. | याचे निष्कर्ष नैसर्गिक शास्त्रांइतके तंतोतंत नसतात आणि प्रत्येक वेळी प्रयोगशाळेत प्रयोग करून पाहणे शक्य होतेच असे नाही. |
| iv. | उदा. जीवशास्त्र, भौतिकशास्त्र, रसायनशास्त्र. | उदा. समाजशास्त्र, मानसशास्त्र, राज्यशास्त्र. |

*२. **सैद्धान्तिक शास्त्र आणि उपयोजित शास्त्र**

उत्तर:

| क्र. | सैद्धान्तिक शास्त्र | उपयोजित शास्त्र |
|---|---|---|
| i. | सैद्धान्तिक शास्त्रात नवीन सिद्धान्तांची निर्मिती आणि जुन्या सिद्धान्तांचे परीक्षण ही प्रक्रिया सातत्याने सुरू असते. | उपयोजित शास्त्रात सैद्धान्तिक ज्ञान व्यावहारिक किंवा वास्तव जीवनात उपयोगात आणले जाते. |

Sample Content

| | | |
|---|---|---|
| ii. | यातील शोध सैद्धान्तिक ज्ञानात भर टाकतात. | यातील शोध खऱ्याखुऱ्या समस्यांवर उपाययोजना शोधण्यात मदत करतात. |
| iii. | समाजशास्त्रीय सिद्धान्तांची निर्मिती व विकास पद्धतशीरपणे झालेला असल्यामुळे ते सैद्धान्तिक शास्त्र आहे. | समाजशास्त्राच्या विविध शाखा या सामाजिक ज्ञानाच्या उपयोजनावर आधारलेल्या असल्यामुळे ते एक उपयोजित शास्त्रसुद्धा आहे. |
| iv. | उदा. सुरुवातीला समाजशास्त्राची रूपरेषा ही भौतिक शास्त्रासारख्या नैसर्गिक विज्ञानाप्रमाणे असावी, असा समाजशास्त्रज्ञांचा आग्रह होता. | उदा. समाजशास्त्रातील विविध तंत्रे व पद्धतींचा वापर व त्यांच्या निष्कर्षांचा उपयोग करून जीवशास्त्राच्या मानवी समाजातील भूमिकेविषयीचा अभ्यास जैव समाजशास्त्रात केला जातो. |

## प्र.४. खालील संकल्पना उदाहरणासह स्पष्ट करा.

**#१. समाजशास्त्रीय कल्पना विस्तार**

**उत्तर:**

i. समाजशास्त्रीय कल्पना विस्तारामुळे दैनंदिन जीवनाचा अर्थ चांगल्याप्रकारे समजण्यास मदत होते.

ii. आपल्या भोवतालच्या समाज आणि संस्कृतीचे आकलन होण्यासाठी सामान्यज्ञानाच्या पलीकडे जाऊन सखोल विचार करणे या कल्पनाविस्तारामुळे शक्य होते.

iii. समाजशास्त्रीय कल्पनाविस्तारामुळे व्यक्तिगत व सामाजिक जीवनातील परस्परसंबंध, तसेच व्यक्तिगत समस्यांच्या आकलनाबरोबर त्यांना सामाजिक संदर्भ लावून त्या सोडवण्यासाठीचा कृतिशील दृष्टिकोन मिळतो.

iv. **उदाहरण:** लिंगभेद ही सामाजिक समस्या सोडवण्यासाठी केलेले प्रयत्न समाजशास्त्रीय कल्पनाविस्तारामुळेच शक्य झाले आहे.

***२. जैव-समाजशास्त्र**

**उत्तर:**

i. ही शाखा नव्याने निर्माण झाली आहे.

ii. यात संशोधक समाजशास्त्रातील विविध तंत्रे आणि पद्धतीचा उपयोग करतात.

iii. तसेच या पद्धतींच्या निष्कर्षांचा उपयोग करून सामाजिक जीवनातील जीवशास्त्राच्या भूमिकेचा अभ्यास करतात.

iv. **उदाहरण:** जीवशास्त्रीय आणि सामजिक घटकांमुळे स्त्रिया आणि पुरुष यांच्यातील साम्य आणि फरक यांचे जैव-समाजशास्त्रात विश्लेषण केले जाते.

***३. डायस्पोरा**

**उत्तर:**

i. ग्रीक भाषेत डायस्पोरा म्हणजे 'विखुरणे' होय.

ii. एखाद्या समूहाने आपल्या मूळ निवासस्थानापासून केलेले स्थलांतर यासाठी 'डायस्पोरा' ही संज्ञा वापरली जाते.

iii. स्थलांतर केल्यानंतरही जे समूह आपल्या मूळ स्थानापासून आपली नाळ तुटू देत नाहीत, अशा गटाला उद्देशून ही संज्ञा वापरली जाते.

iv. **उदाहरण:** अमेरिका, इंग्लंड आणि इतर देशात स्थलांतरित झालेले अनिवासी भारतीय जे आजही त्यांच्या भारतातील मूळ स्थानाशी घट्ट जोडलेले आहेत.

## प्र.५. खालील विधाने चूक की बरोबर ते सांगून सकारण स्पष्ट करा.

**१. समाजशास्त्र हे सामाजिक शास्त्र म्हणवण्यास पात्र नाही.**

**उत्तर:** चूक

**कारण:**

i. समाजशास्त्र हे मानवी समाज आणि सामाजिक घटनांचा शास्त्रीय अभ्यास करते.

ii. यात मानवी समाजाचा उदय, विकास, मानवी समाजाची संरचना आणि कार्ये यांचा अभ्यास केला जातो.

iii. तसेच, हे शास्त्र सामाजिक जीवनातील विविध घटकांमधील परस्परसंबंध व परस्परावलंबन, सामाजिक स्थैर्य व परिवर्तन आणि सामाजिक उत्क्रांती या घटकांवर प्रकाश टाकते.

म्हणूनच, समाजशास्त्र हे सामाजिक शास्त्र आहे.

**#२. राईट मिल्स यांनी समाजशास्त्रात समाजशास्त्रीय कल्पनाविस्तारास स्थान नसते असा युक्तिवाद केला.**

**उत्तर:** चूक

**कारण:**

i. मिल्स यांनी असा युक्तिवाद केला, की ज्यांच्याकडे समाजशास्त्रीय ज्ञान असते त्यांच्याकडे एक खास वैचारिक दृष्टी असते, ती म्हणजे समाजशास्त्रीय कल्पनाविस्ताराची दृष्टी होय.

ii. यामुळे, व्यक्तिगत जीवन आणि सामाजिक जीवनातील परस्परसंबंध समजून घेणे शक्य होते.

iii. मिल्स यांच्या मते, अशा कल्पनाविस्तारामुळे व्यक्तिगत समस्यांचे आकलन होऊन त्यांना सामाजिक संदर्भ लावून त्या सोडवण्यासाठी लागणारा दृष्टिकोनही मिळतो.

**३. औद्योगिक आणि फ्रेंच राज्यक्रांतींनी जुन्या युरोपातील प्रत्येक गोष्टीस आव्हान उभे केले.**

**उत्तर:** बरोबर

**कारण:**

i. फ्रेंच राज्यक्रांती १७८९ मध्ये झाली, त्याचबरोबर औद्योगिक क्रांतीदेखील १८ व्या शतकात इंग्लंडमध्ये घडून आली.

Sample Content

ii. या क्रांतींमुळे वर्गांची पुनर्रचना झाली, धर्माला आव्हान निर्माण झाले आणि धर्माचे महत्त्व कमी होऊ लागले. कौटुंबिक संरचना, मूल्ये बदलली. स्त्रियांच्या समाजातील स्थानात परिवर्तन होऊ लागले. राजेशाही नष्ट होऊन लोकशाही व्यवस्था अस्तित्वात आली.

iii. धर्म, समुदाय, सत्ता, संपत्ती आणि समाज यांच्या संकल्पना बदलत गेल्या.

यावरून असे म्हणता येईल, की औद्योगिक आणि फ्रेंच राज्यक्रांतींनी जुन्या युरोपातील प्रत्येक गोष्टीस आव्हान उभे केले.

*४. **फ्रेंच राज्यक्रांतीमुळे समाजात बदल घडून आले.**

**उत्तर:** बरोबर

**कारण:**

i. फ्रेंच राज्यक्रांतीमुळे फ्रान्स आणि संपूर्ण युरोपमध्ये दूरगामी सामाजिक बदल घडून आले.

ii. या क्रांतीने स्वातंत्र्य, समता आणि बंधुता ही मूल्ये समाजात रुजवली.

iii. ही राज्यक्रांती स्वातंत्र्यलढ्याच्या इतिहासात मैलाचा दगड ठरली. सरंजामशाही नष्ट होऊन नवीन समाजव्यवस्था अस्तित्वात आली.

iv. या क्रांतीतून पुढे अनेक राजकीय क्रांतींच्या मालिका सुरू झाल्या. तसेच, समाजशास्त्राचा उदय होण्यात या राज्यक्रांतीचे महत्त्वाचे योगदान आहे.

*५. **नैसर्गिक शास्त्रांमधील प्रगतीचा प्रभाव एक विद्याशाखा म्हणून समाजशास्त्रावर झाला.**

**उत्तर:** बरोबर

**कारण:**

i. नैसर्गिक शास्त्रे भौतिक जगाशी संबंधित असतात. नैसर्गिक शास्त्रांतील प्रगतीचा प्रभाव केवळ भौतिक बदलांपुरताच मर्यादित नसून तो समाजाबद्दलच्या कल्पनांवरही होतो.

ii. नैसर्गिक शास्त्राच्या शाखा आणि समाजशास्त्र यांमध्ये आंतरसंबंध असतात. उदा. जैव-समाजशास्त्र ही शाखा समाजशास्त्रामध्ये नव्याने निर्माण झाली आहे.

iii. यासाठी आणखी एक स्पष्टीकरण असे देता येईल, समाजशास्त्रात शास्त्रीय पद्धतींचा वापर केला जातो. निरीक्षण, प्रयोग, परीक्षण अशा वैज्ञानिक प्रक्रियांच्या माध्यमातून समाजशास्त्रात नियम मांडले जातात. म्हणूनच, विज्ञानात झालेल्या विकासाचा समाजशास्त्रावर परिणाम होतो.

६. **विकास अध्ययनाच्या क्षेत्रात व्यवसायाच्या फार कमी संधी उपलब्ध आहेत.**

**उत्तर:** चूक

**कारण:**


i. विकास अध्ययनास व्यावसायिक जगतात खूप मोठा वाव आहे.

ii. सार्वजनिक क्षेत्रातील संशोधन आणि धोरणांचे विश्लेषण; बिगरशासकीय संस्था आणि मानवतावादी कार्य; विकास कार्यक्रमांचे नियोजन आणि अंमलबजावणी; आंतरसांस्कृतिक संबंधांबाबत सल्लामसलत; आंतरराष्ट्रीय विकास, सार्वजनिक आरोग्य; पर्यावरणात्मक आणि हवामानातील बदल यांचे संशोधन अशा अनेक संधी या क्षेत्रात उपलब्ध आहेत.


iii. याशिवाय, स्थानिक आणि आंतरराष्ट्रीय पत्रकारिता, आस्थलांतर आणि निर्वासितांसाठी सेवा, प्रवास व पर्यटनविषयक कार्य, जनसंपर्क व संवाद, समुदायातील काम, शहर नियोजन यांसारख्या अनेक संधी विकास अध्ययन क्षेत्र उपलब्ध करून देते.

**प्र.६. (अ) संकल्पनाचित्र तयार करा.**

१.




*२.




**उत्तर:**

१. i. अनुभवाधिष्ठित विज्ञान
ii. सैद्धान्तिक आणि उपयोजित विज्ञान
iii. तथ्यांवर आधारित विज्ञान
iv. समग्र विज्ञान

२. i. समाजाचा शास्त्रीय पद्धतीने अभ्यास
ii. मानवाला काळानुरूप ज्ञान देते आणि दक्ष ठेवते.
iii. वैज्ञानिक दृष्टिकोन विकसित करते.
iv. व्यवसायाभिमुख
v. सामाजिक समस्यांवर उपाययोजना करते.
vi. समाजातील विविधतेसंबंधी ज्ञान देते.

[**टीप:** वरील उत्तरामध्ये विद्यार्थ्यांनी कोणतेही चार मुद्दे लिहिणे अपेक्षित आहे.]

sample content

**प्र.६. (ब) आपले मत नोंदवा.**

**१. सामाजिक परिस्थिती आणि विचार यांच्यात काही संबंध आहे का?**

**उत्तर:** होय.

i. एखाद्या काळात असलेल्या सामाजिक परिस्थितीचा आणि त्या विशिष्ट काळात उदयास आलेल्या विचारांचा नेहमीच संबंध असतो. तसेच, त्यांच्यात सुसूत्रता असते.

ii. खरं तर, समाज आणि त्या काळातील प्रबळ कल्पना यांच्यातील संबंधांचे परीक्षण करून समाजशास्त्राचा उदय कसा झाला हे समजून घेता येते .

iii. पूर्वीच्या समाजशास्त्रज्ञांनी मांडलेल्या कल्पनांचे मूळ हे प्रबोधनकाळातील युरोपमधील सामाजिक परिस्थितीमध्ये दिसून येते.

iv. त्यामुळे, सामाजिक परिस्थिती आणि विचार यांचा निश्चितच संबंध असतो.

***२. भारत प्रगतीच्या वैज्ञानिक अवस्थेत आहे का? तुमच्या मताचे स्पष्टीकरण द्या.**

**उत्तर:** होय.

i. याचा संबंध प्रगतीच्या अशा अवस्थेशी आहे ज्यात वैज्ञानिक दृष्टिकोन मोठ्या प्रमाणावर स्वीकारला गेला आहे.

ii. पूर्वीच्या काळापेक्षा आता तर्कशुद्ध कारणमीमांसा, विवेकवादी विचारसरणी यांवर भारतात जास्त भर दिला जातो.

iii. जीवनाच्या प्रत्येक क्षेत्रात तंत्रज्ञानातील सुधारणांचा मोठा प्रभाव पडत असतानादेखील अंधश्रद्धा आणि निरक्षरता यांचे अजूनही समूळ उच्चाटन झालेले नाही.

म्हणून, भारत 'प्रगतीच्या वैज्ञानिक अवस्थेत' आहे.

***३. चित्रपट आणि समाज यांच्यातील संबंधांविषयी थोडक्यात सांगा.**

**उत्तर:**

i. वर्ग, जात, वांशिकता, लिंगभाव यांसारख्या समाजातील विविध घटकांचा अभ्यास करण्यासाठी समाजशास्त्रामध्ये चित्रपटांकडे संहिता म्हणून बघितले जाते.

ii. तसेच, चित्रपटांचा समाजावर सांस्कृतिक, राजकीय, आर्थिक प्रभावही पडतो.

iii. त्याचप्रमाणे ज्या प्रकारचा समाज आहे त्याचा चित्रपट निर्मितीवर प्रभाव पडत असतो.

iv. 'चित्रपटांतून समाजशास्त्र' किंवा 'चित्रपटांचे समाजशास्त्र' अशा अभ्यासक्रमातून या दोन्हींतील आंतरसंबंध स्पष्टपणे दिसून येतो.

**४. समाजशास्त्रीय ज्ञान हे वास्तव जीवनात व्यवहारात आणता येते का?**

**उत्तर:** होय.

i. समाजशास्त्र हा केवळ बंद खोलीत शिकवण्याचा विषय नाही.

ii. समाजशास्त्राच्या अनेक शाखा सैद्धान्तिक ज्ञान प्रत्यक्ष व्यावहारिक जीवनात अमलात आणतात.

iii. समाजशास्त्रीय ज्ञान विविध क्षेत्रांत उपयुक्त ठरते. उदा. उद्योगधंदे, सामाजिक सेवा, स्पर्धापरीक्षा, जनसंपर्क, पत्रकारिता, विमा क्षेत्र, ग्रामीण विकास, योजना आणि नियोजन, सार्वजनिक आरोग्य, सामाजिक संशोधन, पोलीस विभाग, आदिवासी कल्याण, सर्वसमावेशक शिक्षण, उपभोक्ता संशोधन आणि इतर अनेक क्षेत्रे.

iv. यावरून समाजशास्त्रीय ज्ञान हे वास्तव जीवनात व्यवहारात आणता येते हे दिसून येते.

**प्र.७. खालील प्रश्नांची सविस्तर उत्तरे लिहा.**

**१. समाजशास्त्राचा उदय कसा झाला ते स्पष्ट करा.**

**उत्तर:** समाजशास्त्राच्या उदयासाठी कारणीभूत घटक किंवा परिस्थिती व त्यातील महत्त्वपूर्ण बाबी खालीलप्रमाणे आहेत.

| क्र. | सामाजिक / आर्थिक परिस्थिती | कालखंड | महत्त्वाचे मुद्दे |
|---|---|---|---|
| i. | व्यापारी क्रांती | सन १४५० ते १८०० दरम्यान | i. व्यापार, उद्योग आणि बँक सेवा अधिकाधिक विस्तारित होऊ लागली.<br>ii. मध्यमवर्गाचा प्रभाव वाढू लागला.<br>iii. मध्ययुगीन युरोपातील अर्थव्यवस्था वेगवान आणि जागतिक बनली.<br>iv. युरोपीय देशांची आर्थिक व राजकीय सत्ता निर्माण झाली. |
| ii. | औद्योगिक क्रांती | १८ व्या शतकात इंग्लंडमध्ये | i. नवीन साधनांचा आणि तंत्रज्ञानाचा शोध लागला.<br>ii. सरंजामशाही व्यवस्थेचे भांडवलशाही व्यवस्थेत रूपांतर झाले.<br>iii. हस्तनिर्मित वस्तूंची जागा यंत्राद्वारे बनवल्या जाणाऱ्या वस्तूंनी घेतली.<br>iv. संघ पद्धती संपुष्टात आली आणि कारखाना पद्धतीचा उदय झाला. |

Sample content

| | | | |
|---|---|---|---|
| iii. | फ्रेंच (राजकीय क्रांती) | फ्रान्स १७८९ | i. स्वातंत्र्य आणि समता यांसाठीच्या मानवी लढ्याच्या इतिहासातील मैलाचा दगड ठरली.<br>ii. स्वातंत्र्य, समता आणि बंधुता या मूल्यांची निर्मिती आणि नवीन समाजव्यवस्था अस्तित्वात आली.<br>iii. राजकीय क्रांतीची मालिका समाजशास्त्राच्या निर्मितीसाठी महत्त्वपूर्ण घटक ठरली. |
| iv. | वैज्ञानिक क्रांती | युरोपमध्ये पुनरुज्जीवन कालखंडात | i. विज्ञानावर भर देण्यात आला आणि विज्ञानाशी संबंधित व्यक्तींना समाजात खूप प्रतिष्ठा मिळत होती.<br>ii. तांत्रिक विकासाचा जीवनाच्या प्रत्येक क्षेत्रांत प्रभाव दिसून येत होता.<br>iii. विज्ञानातील शोध आणि कल्पनांमुळे युरोपमध्ये समाजशास्त्राचा उदय झाला.<br>iv. समाजशास्त्रामध्ये वैज्ञानिक दृष्टिकोन रुजवला गेला. |
| v. | नागरीकरण | मुख्यत्वे औद्योगिक क्रांतीचा परिणाम | i. लोक रोजगाराच्या शोधांत शहरांकडे स्थलांतर करू लागले.<br>ii. वाढत्या स्थलांतरामुळे असंख्य समस्या निर्माण झाल्या.<br>iii. मॅक्स वेबर आणि जॉर्ज सिमेल यांसारखे पूर्वीचे समाजशास्त्रज्ञ शहरी जीवनाचे स्वरूप आणि समस्या यांकडे आकर्षित झाले.<br>iv. नागरीकरणाच्या समस्यांचा अभ्यास करण्यासाठी पहिले अमेरिकन समाजशास्त्रीय विचारपीठ शिकागो स्कूल निर्माण झाले. |

***२. आजच्या जगातील समाजशास्त्राची व्याप्ती याची सुयोग्य उदाहरणांद्वारे चर्चा करा.**

**उत्तर:** समाजशास्त्राची व्याप्ती खालील अभ्यास क्षेत्रांच्या साहाय्याने स्पष्ट करता येते.

| | अभ्यास क्षेत्र | अभ्यासाचा विषय | उदाहरण |
|---|---|---|---|
| i. | जैव-समाजशास्त्र | मानवी सामाजिक जीवनातील जीवशास्त्राची भूमिका | जीवशास्त्रीय आणि सामाजिक घटकांमुळे स्त्री आणि पुरुषांमध्ये असणारे साम्य आणि फरक यांचे विश्लेषण. |
| ii. | कलेचे समाजशास्त्र | कलेच्या उत्पादन व ग्रहणाचा सामाजिक संदर्भ समजून घेण्याचा प्रयत्न केला जातो. | शिल्पांचे परीक्षण आणि त्या काळातील प्रचलित सामाजिक परिस्थितीचा अभ्यास. |
| iii. | विपणन बाजार संशोधनाचे समाजशास्त्र | समाजशास्त्रातील सैद्धान्तिक ज्ञान आणि बाजारनिती | दिवाळीदरम्यान सणविषयक जाहिराती आणि ख्रिसमसच्या काळात दिल्या जाणाऱ्या सवलती. |
| iv. | दृश्य माध्यमांचे समाजशास्त्र | सामाजिक जीवनातील सर्व दृश्यांचा अभ्यास | छायाचित्रे आणि लघुपट या माध्यमांतील माहितीद्वारे शहरी जीवनाच्या समस्यांचे विश्लेषण. |
| v. | डायस्पोरा अध्ययन | स्थलांतर, त्याचे सामाजिक जीवनावर आणि आंतरराष्ट्रीय संबंधांवर होणारे परिणाम | ग्रामीण भागांतून शहरांकडे होणाऱ्या स्थलांतराचा अभ्यास किंवा नोकरीनिमित्त एका देशातून दुसऱ्या देशात केले जाणारे स्थलांतर. |

[**टीप:** संदर्भ प्र. २.(ब) - ६ प्रत्येक क्षेत्रावरील सविस्तर स्पष्टीकरणासाठी पाहा.]

**३. समाजशास्त्राचे महत्त्व विशद करा.**

**उत्तर:** समाजशास्त्राचे महत्त्व खालीलप्रमाणे विशद करता येते.

**i. समाजशास्त्र समाजाचा शास्त्रशुद्ध अभ्यास करते.**

अ. गुंतागुंतीच्या मानवी समाजाचा शास्त्रीय अभ्यास करता येतो.

ब. स्वत:तील क्षमता ओळखण्यास मदत होते.

क. बदलत्या पर्यावरणाशी जुळवून घेणे सोपे करते.

ड. सामाजिक जीवन समजून घेण्यास आणि विविध क्षेत्रांमध्ये प्रगती साधण्यास मार्गदर्शन करते.

**ii. समाजशास्त्र समाजातील विविधतेसंबंधी ज्ञान देते.**

अ. विविध समाज, समुदाय, समूह आणि त्यांची जगण्याची वैशिष्ट्यपूर्ण पद्धती, तसेच सांस्कृतिक विविधता आणि धार्मिक व प्रादेशिक विविधता यांचे ज्ञान मिळते.

ब. समाजाचे बहुआयामी स्वरूप समजावून घेता येते.

Sample Content

**iii. समाजशास्त्र हे व्यवसायाभिमुख आहे.**

अ. समाजशास्त्रीय ज्ञानाला व्यावसायिक जीवनात फार महत्त्व आहे.

ब. गतिमान समाज, त्यातील बदलत्या गरजा आणि व्यवसायाचे बदलते स्वरूप समजून घेण्यास व यांचा ताळमेळ घालण्यास मदत करते.

क. समाजशास्त्राच्या विविध शाखा सैद्धान्तिक ज्ञान व्यावहारिक जीवनात उपयोगात आणतात.

**iv. समाजशास्त्रामुळे वैज्ञानिक दृष्टिकोन विकसित होतो.**

अ. सामाजिक वास्तवाकडे पाहण्याचा शास्त्रीय दृष्टिकोन विकसित होतो.

ब. अधिकाधिक वस्तुनिष्ठ, विवेकवादी, पूर्वग्रहमुक्त आणि सकारात्मक विचार करण्यास प्रवृत्त करते.

**v. समाजशास्त्राच्या मदतीने सामाजिक समस्यांवर उपाययोजना शोधता येतात.**

अ. सामाजिक समस्यांचे विश्लेषण करण्यास मदत करते. उदा. दारिद्र्य, बेकारी, दहशतवाद, बालगुन्हेगारी इत्यादी.

ब. हे प्रश्न सोडवण्यासाठी समाजशास्त्रीय दृष्टिकोनाचा योग्य वापर करून सामाजिक प्रश्न सोडवण्याचा प्रयत्न केला जातो.

**vi. समाजशास्त्र मानवाला काळानुरूप ज्ञान देते आणि दक्ष ठेवते.**

अ. समाजशास्त्राला व्यावहारिक मूल्य आहे आणि ते समाजातील विविध घटकांबाबत ज्ञान देते व दक्ष ठेवते.

ब. काळानुरूप ज्ञान मिळाल्यामुळे सामाजिक परिस्थितीस योग्य प्रतिसाद कसा द्यावा याचे भान मिळते.

## उपक्रम

**[टीप:** उपक्रमांची उत्तरे ही व्यक्तिनिष्ठ असतात. दिलेली उत्तरे ही संदर्भादाखल आहेत. विद्यार्थ्यांनी हे उपक्रम स्वत: सोडवणे अपेक्षित आहे.**]**

**१. व्यापारी, वैज्ञानिक, औद्योगिक आणि फ्रेंच राज्यक्रांती हे समाजशास्त्राच्या निर्मितीसाठी महत्त्वपूर्ण घटक आहेत याचा अभ्यास आपण केला. भारताच्या संदर्भात औद्योगिक विकासाचा भारतीय समाजावर झालेला परिणाम जाणून घ्या.**

(पाठ्यपुस्तक पृष्ठ क्र. ७)

**उत्तर:** औद्योगिक विकासाचा भारतीय समाजावर झालेला परिणाम पुढीलप्रमाणे आहे.

i. उत्पादन तंत्रांचे आधुनिकीकरण

ii. उत्पादनाचा विस्तार

iii. रोजगार संधीत वाढ

iv. सुधारलेले राहणीमान

**२. तुमच्या परिसरातील दोन स्थलांतरित व्यक्तींची मुलाखत घ्या. स्थलांतराचे कारण, अनुभव व समस्यांसंबंधी आपण काढलेल्या निष्कर्षांची वर्गात चर्चा करा.** (पाठ्यपुस्तक पृष्ठ.क्र.९)

**उत्तर:**

i. रोजगाराच्या संधी, उच्च शिक्षण, चांगल्या सामाजिक आणि आर्थिक सोयी-सुविधा अशा विविध कारणांसाठी लोक शहरी भागांकडे स्थलांतर करतात.

ii. स्थलांतरितांना साधारणपणे भाषेचे अडथळे, जीवनशैलीतील बदल, नवीन सामाजिक-आर्थिक वातावरणाशी ओळख आणि नवीन शहराविषयी नसलेली माहिती अशा समस्यांचा सामना करावा लागतो.

**३. तुमच्या परिसरातील कुठल्याही बिगरशासकीय संस्थेला भेट देऊन त्यांच्या कामाबद्दल माहिती गोळा करा आणि त्याचे वर्गात PPT सादरीकरण करा.**

(पाठ्यपुस्तक पृष्ठ.क्र.१०)

**उत्तर:** महाराष्ट्रात नाम फाऊंडेशन, पाणी फाऊंडेशन, मानवलोक, अफार्म यांसारख्या अनेक बिगरशासकीय संस्था विविध सामाजिक क्षेत्रात काम करत आहेत.

***४. वर्गामध्ये प्रत्येकी ५-७ विद्यार्थी-विद्यार्थिनींचे गट करून खालील मुद्द्यांवर गटचर्चा घडवून आणा.**

**i. समाजशास्त्र हा दैनंदिन जीवनाशी जोडलेला विषय आहे.**

**ii. समाजशास्त्रामधील नोकरी / व्यवसायाच्या संधी.**

**उत्तर:**

i. समाजशास्त्र हा केवळ बंद खोलीत अभ्यासण्याचा विषय नाही. समाजशास्त्राचा व्यावहारिक पैलू जैव-समाजशास्त्र, कलेचे समाजशास्त्र, विपणन बाजार संशोधनाचे समाजशास्त्र, दृश्य-माध्यमांचे समाजशास्त्र आणि डायस्पोरा अध्ययन या क्षेत्रांतील वापरावरून समजून येतो.

ii. समाजशास्त्रीय ज्ञानास व्यावसायिक जीवनात फार महत्त्व आहे. या क्षेत्रातील काही व्यवसायाच्या संधी अशा आहेत: सार्वजनिक क्षेत्रातील संशोधन आणि धोरण विश्लेषण; बिगर शासकीय संघटना आणि मानवतावादी कार्य; विकास कार्यक्रम नियोजन आणि अंमलबजावणी; स्थानिक आणि आंतरराष्ट्रीय पत्रकारिता; आंतरसांस्कृतिक संबंधांबाबत सल्लामसलत; आंतरराष्ट्रीय विकास; सार्वजनिक आरोग्य; पर्यावरणात्मक आणि हवामानातील बदल यांचे संशोधन.

## सराव चाचणी

**वेळ: १.३० तास** **एकूण गुण: २५**

**प्र.१. दिलेल्या पर्यायांपैकी योग्य पर्याय निवडून विधाने पूर्ण करा.** **[३]**

१. Logos या शब्दाचा अर्थ _______ हा होय. (सहयोगी, शास्त्र, पद्धती शास्त्र)

२. _______ क्रांती १८ व्या शतकात युरोपमध्ये घडून आली. (व्यापारी, औद्योगिक, वैज्ञानिक)

३. ग्रीक भाषेत डायस्पोरा म्हणजे _______ होय. (विखुरणे, भटकणे, रूपांतर)

**प्र.२. फरक स्पष्ट करा. (कोणताही एक)** **[४]**

१. नैसर्गिक शास्त्र आणि सामाजिक शास्त्र

२. सैद्धान्तिक शास्त्र आणि उपयोजित शास्त्र

**प्र.३. खालील विधाने चूक की बरोबर ते सांगून सकारण स्पष्ट करा. (कोणतेही एक)** **[४]**

१. फ्रेंच राज्यक्रांतीमुळे समाजात बदल घडून आले.

२. समाजशास्त्र हे सामाजिक शास्त्र म्हणवण्यास पात्र नाही.

**प्र.४. टीप लिहा. (कोणतीही एक)** **[४]**

१. प्रबोधन काळ

२. समाजशास्त्र या शब्दाचा उगम

**प्र.५. खालील प्रश्नाचे सविस्तर उत्तर लिहा. (कोणताही एक)** **[१०]**

१. समाजशास्त्राचा उदय कसा झाला ते स्पष्ट करा.

२. समाजशास्त्राचे महत्त्व विशद करा.

Sample Content

सराव चाचणीची उत्तरे पाहण्याकरता विद्यार्थ्यांनी सोबत दिलेला **Q.R. Code** स्कॅन करावा.

# AVAILABLE NOTES FOR STD. XI & XII:

## SCIENCE

### Perfect Series:

For students who want to excel in board exams and simultaneously study for entrance exams.

- Physics Vol. I
- Physics Vol. II
- Chemistry Vol. I
- Chemistry Vol. II
- Mathematics & Statistics Part - I
- Mathematics & Statistics Part - II
- Biology Vol. I
- Biology Vol. II

### Precise Series:

For students who want to excel in board exams.

- Physics
- Chemistry
- Biology

### Additional Books for Std. XII Sci. & Com.:

- A collection of Board Questions (PCMB)
- 16 Model Question Papers with solutions (PCMB)
- Solution to HSC Board Question Bank (Science)
- Solution to HSC Board Question Bank (Commerce)

## COMMERCE (ENG. & MAR. MED.)

### Smart Notes:

- Book-Keeping and Accountancy
- Book Keeping and Accountancy (Practice)
- Economics
- Organisation of Commerce and Management
- Secretarial Practice
- Mathematics and Statistics - I
- Mathematics and Statistics - II
- Supplementary Questions (BK • ECO • OCM • SP)

## ARTS (ENG. & MAR. MED.)

- History
- Geography
- Political Science
- Psychology
- Sociology

Books available for MHT-CET, NEET & JEE

### Languages:

- English Yuvakbharati
- Hindi Yuvakbharati
- Marathi Yuvakbharati




Scan the QR code to download our Quill App & get free access of 1 chapter

## OUR PRODUCT RANGE

Children Books | School Section | Junior College
Degree College | Entrance Exams | Stationery

**Visit Our Website**

**Target Publications® Pvt. Ltd.**
Transforming lives through learning.

**Address:**
2nd floor, Aroto Industrial Premises CHS,
Above Surya Eye Hospital, 63-A, P. K. Road,
Mulund (W), Mumbai 400 080
**Tel:** 88799 39712 / 13 / 14 / 15
**Website:** www.targetpublications.org
**Email:** mail@targetpublications.org




Explore our range of STATIONERY